नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 28/08/2021 (शनिवार)
(सायंकाळ)

---

### अवैद्य सुगंधीत तंबाखु व पानमसाला बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
### एकुण 14,73,880/—रू. चा मुद्देमाल जप्त
### पोलिस स्टेशन केळवदची कारवाई

पो.स्टे. केळवद :— अंर्तगत 9 कि. मी. अंतरावर बिहाडा फोटा येथे दि. 26/08/2021 चे 13:30 वा. ते 15.00 वा. चे सुमारास फिर्यादी नामे— श्रीमती स्मिता विवके बाबरे, वय 42 वर्ष, रा. अन्न सुरक्षा अधिकारी म.रा. नागपूर यांना बातमीदारा मार्फत माहीती मिळाली की, आयशर कंटेनर एपी— 48/जी—2153 मधून सरकारव्दारे बंदी असणाऱ्या तंबाखु व पानमसालाची वाहतुक होत आहे. अशी माहिति मिळाल्यावर त्यांनी पो.स्टे केळवद पोलिस स्टाफ यांच्या मदतीने बिहाडा फाटा येथे नाकाबंदी केली. पो.स्टे. केळवद पथकाने रस्त्याने येत असलेल्या आयशर कंटेनर एपी— 48/जी—2153 ला थांबवून चेक केले असता त्यामध्ये मिळालेल्या माहिती प्रमाणे सुगंधीत तंबाखु व पानमसाला असल्याचे आढळून आले. त्यासोबत असणारा आयसर गाडीचा चालक आरोपी नामे— प्रेमलाल कडकु चौकीकर, वय 58 वर्ष, वार्ड क्र. 1 हनुमान मंदीर जवळ, परसोडी ता. आमला जि. बैतुल एमपी याला अटक करण्यात आले. आरोपीच्या ताब्यातून प्रतिबंधीत सुगंधी तबाखु क्र 1. जनम 535 चे 88 पॅाकेट कि.22000/—रू., . 2. राजश्री पानमसाला 875 पॅाकेट कि. 1,89,000/—रू., 3. ब्लॅक लेबल 18 चे 1100 पॅाकेट कि. 26400/—रू., 4. एमडी सुंगधीत तंबाखुचे 120 पॅाकेट कि. 60,000/—रू. 5. एमडी सुंगधीत तंबाखुचे 80 पॅाकेट कि. 20,000/रू., 6. व्ही वन तंबाखुचे 660 पॅाकेट कि. 14,520/रू., 7. व्ही वन तंबाखुचे 600 पॅाकेट कि. 18,000/—रू., 8. विमल मामसालाचे 500 पॅाकेट कि. 99000/—रू. 9. विमल मामसालाचे 5208 पॅाकेट कि. 24960/—रू. चा माल व एपी— 48/जी—2153 क्रमांकाचा आयसर गाडी कि. 10,00,000/—रू. चा असा एकुण कि. 4,73,880/—रू. चा मुद्देमाल मिळुन आले.

पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम 328, 272, 273, 188, 34 भादवी, सहकलम अन्नसुरक्षा च मानदेकायदा 2006 कलम 26(1)26(2)(आयव्ही), 27(3)(ई), 30 अ तसेच 3(1)(झेड झेड) आय आय आय, व्ही शिक्षापात्र कलम 59 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.नि.राहुल सोनवणे मो.न 70205 77459 हे करीत आहे.

# विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. जलालखेडा :– दिनांक 21/11/2017 चे 20.38 वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे अप. क्र. 135/2017 कलम 354 (अ)(ब) भादवी सहकलम 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 21/11/2017 चे 13.30 वा. दरम्यान 13 वर्षीय पीडित/फिर्यादी मुलगी हि घरी एकटी असतांना आरोपी नामे– अमोल वसंतराव सोनोले, वय 30 वर्ष, रा. थुगाव देव ता. नरखेड जि. नागपूर याने पिडीतेच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. आरोपीला दिनांक 21/11/2017 चे 22.38 वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री. विजय कोरडे, पो.स्टे. जलालखेडा यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. दिंनाक 27/08/2021 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्रीमती पी.एफ.सैय्यद, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम 354 (ब) भादंवि. व 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायदा मध्ये 3 वर्ष सश्रम कारावास व 5,000/–रु. दंड व दंड न भरल्यास 6 महीने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. गवळी यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सहायक पोलिस निरीक्षक श्री. किशोर वैरागडे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. रमेश धामने, श्री. मनोज तिवारी, पोहवा श्री. अशोक कोरडे, श्री. सुनिल डोंगरे यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर